दैनिक तरुण भारत

२ मार्च १९९९

(51)

## व्ही. टी. पाटील फाऊंडेशनचे उद्‌घाटन

# स्पर्धेच्या युगात संस्कृती टिकविण्यासाठी प्रयत्न हवा

**- माधव गडकरी यांचे मत**

कोल्हापूर, दि. १ (प्रतिनिधी) - 'देशाचे राजकारण आणि समाजकारणाचे परिणाम सध्याच्या पिढीवर होत आहेत. त्यामुळे जीवनच उध्वस्त होत आहे की काय, असे वाटत आहे. आगरकर - कर्वे - फुले - विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारखे समाजसुधारक अन्य प्रांतांच्या तुलनेत आपल्यांकडेच अधिक असताना आज वेगाशी स्पर्धा करण्याच्या युगात विकृती निर्माण होत आहे. ती दूर करून संस्कृती टिकविण्याच्या दृष्टीने प्रयत्न अपेक्षित असताना व्ही. टी. पाटील फाऊंडेशनसारख्या संस्था तयार होत आहेत हे कौतुकास्पद आहे,' असे उद्‌गार ज्येष्ठ पत्रकार माधव दीपप्रज्वलनाने डॉ. व्ही. टी. पाटील फाऊंडेशनचे उद्‌घाटन केशवराव भोसले नाट्यगृहातील समारंभात करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी महापौर सौ. जयश्री जाधव या होत्या.

स्वागतगीतानंतर फाऊंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त कांचन परुळेकर यांनी फाऊंडेशनच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट केला. फाऊंडेशनचे एक विश्वस्त डॉ. अनिल राज जगदाळे यांनी शुभसंदेशाचे वाचन केल्यानंतर दै. सकाळचे संपादक अनंत दीक्षित यांनी फाऊंडेशनच्यावतीने नजिकच्या काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. केवळ जाहिरातीनी आणि प्रसिद्धीमुळे माणसे मोठी होत नाहीत, तर डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या प्रमाणे माणसं उभारणारी माणसं आवश्यक आहेत, असेही ते म्हणाले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील सुधारकानी सामाजिक सुधारणा आणि महिलांच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेऊन श्री. गडकरी पुढे म्हणाले की, आज सर्वत्र 'ग्राहक संस्कृती' तयार होताना दिसत आहे. इतिहासाचा मागोवा घेत घेत आपले सांस्कृतिक वैभव टिकविण्याच्या दृष्टीने व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशेने या फाऊंडेशनने प्रयत्न करावेत, या कार्यक्रमास कोल्हापूर आणि परिसरातील विविध थरातील मान्यवर उपस्थित होते.

# टाडा मागे घेण्याची बुध्दीवाद्यांची मागणी